मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# बारणे यांचा विजय महत्त्वाचा : बावनकुळे

## मोदी पंतप्रधान होण्यासाठी बारणे यांना मताधिक्याने निवडून आणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी पुन्हा विराजमान होण्यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचा विजय भाजपसाठी महत्वाचा आहे, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप कार्यकर्त्यांना बजावले.

मावळ लोकसभा मतदारसंघातील भाजपचे लोकप्रतिनिधी व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक काल पुण्यात झाली. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, आमदार अश्विनी जगताप, प्रशांत ठाकूर, उमा खापरे, पिंपरी चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप तसेच शरद बुट्टे पाटील, अविनाश कोळी, विक्रांत पाटील, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते.

मावळ लोकसभा मतदारसंघ भाजपला मिळावा अशी भाजपच्या कार्यकर्त्यांची आग्रही मागणी होती. महायुतीच्या जागा वाटपात मावळची जागा शिवसेनेकडेच कायम राहिल्यामुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये काहीशी नाराजी होती. या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी सर्व कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व कार्यकर्त्यांना पक्षाची भूमिका समजावून सांगितली.

बावनकुळे म्हणाले की, भाजप आणि शिवसेनेची युती खूप जुनी आहे. मध्यंतरी उद्धव ठाकरे यांनी वेगळी भूमिका घेतल्यामुळे सर्वाधिक आमदार असूनही आपल्याला अडीच वर्षे विरोधात बसावे लागले होते. एकनाथ शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठे धाडस व त्याग केल्यामुळे आपण राज्यात पुन्हा सत्तेत आलो, हे कदाचित विसरून चालणार नाही. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी महायुतीचा निर्णय घेतला असून त्याचे पालन करीत आपण सर्व मित्र पक्षांना एकत्र घेऊन काम करणे आवश्यक आहे.

मावळचीच काय तर रामटेकची जागा देखील महायुतीत शिवसेनेला सोडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'अब की बार चार सौ पार' हे लक्ष्य निर्धारित केले आहे. विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही किंतु-परंतु मनात न ठेवता झोपून देऊन काम केले पाहिजे. मोदी पुन्हा पंतप्रधान होण्यासाठी मावळात धनुष्यबाण हे चिन्ह आहे, हे खरोखर जाऊन मतदारांना सांगा व बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणा, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी खासदार बारणे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.

भाजपकडून सर्वेक्षणाद्वारे शिंदे गटावर दबाव टाकला जात होता का? यावर बावनकुळे म्हणाले, "प्रत्येक पक्ष सर्वेक्षण करतो, त्यानुसार आम्हीही सर्वेक्षण केले. त्याद्वारे शिंदे यांच्यावर कुठलाही दबाव टाकण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांनी त्यांच्या पक्षाचा निर्णय करायचा आहे. आमच्यात समन्वय आहे. शेवटी विजय महत्त्वाचा आहे.



### खासदार बारणे यांची भूमिका

खासदार बारणे यांनी त्यांची भूमिका भाजप कार्यकर्त्यांसमोर स्पष्ट केली. 'मी आत्तापर्यंत महायुती म्हणून चार निवडणुका एकत्र लढवल्या आहे. चिंचवड विधानसभेची निवडणूक व लोकसभेची ही तिसरी निवडणूक मी लढवत आहे. माझ्या सर्व निवडणुकांमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी मला खूप मोठी मदत केली आहे. त्याची जाणीव मी देखील सातत्याने ठेवली आहे. आतापर्यंत कोणतेही चुकीचे काम मी केलेले नाही. मध्यंतरी काही काळ विरोधात बसावे लागले तरी आपण कधीही भाजपच्या विरोधात वक्तव्य केले नाही. पक्षीय दृष्टिकोन डोळ्यापुढे न ठेवता आपण सर्वांची कामे केली,' याकडे बारणे यांनी लक्ष वेधले.कोविडच्या काळात खासदारांना निधी मिळाला नव्हता. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी निधी उपलब्ध करून दिला. पुणे जिल्ह्याच्या निधी वाटपाची जबाबदारी बाळा भेगडे यांच्यासह काही भाजपच्या नेत्यांकडे आहे. त्यामुळे या संदर्भातील आरोप गैरसमजुतीतून आहेत. या व्यतिरिक्त भाजपच्या कार्यकर्त्यांना काही शंका असतील तर त्या देखील चर्चेतून दूर केल्या जातील, अशी ग्वाही बारणे यांनी दिली.


# पवना वगळता आंद्रा, वडिवळेत निम्म्यापेक्षा अधिक पाणीसाठा

## उन्हाळा तीव्र होत असताना धरणांमधील पाणसाठ्याच्या बाष्पीभवनाचा वेगदेखील वाढला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडकर मागील चार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात आहेत. तर 2025 पर्यंत दिवसाआड पाणीपुरवठा कायम राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्याने समान पाणीपुरवठ्याचे कारण देत महापालिका प्रशासनाने एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. काही दिवसांसाठी सुरू केलेला असा पाणीपुरवठा साडे चार वर्षे झाले, तरी कायम आहे उन्हाची तीव्रता वाढत असताना, पाण्याची समस्या उग्र रुप धारण करु लागली आहे. तीनपैकी दोन धरणांमधील पाणीसाठा निम्म्यापेक्षा अधिक आहे. मात्र ही सर्व जलाशये लघु प्रकल्पांतर्गत येत असल्याने, नागरिकांना पुढील दोन ते अडीच महिने पाणी जपून वापरावे लागणार आहे.



उन्हाळा तीव्र होत असताना धरणांमधील पाणसाठ्याच्या बाष्पीभवनाचा वेगदेखील वाढला आहे. पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविण्यासाठी पवना धरणातून दररोज पाणी रावेत बंधाऱ्यापर्यंत सोडले जात आहे.

वडिवळे धरणात सर्वाधिक 59.66 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्याखालोखाल आंद्रा धरणामध्ये 52.58 टक्के पाणसाठा उपलब्ध आहे. तर पिंपरी-चिंचवडकर, मावळ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व एमआयडीसीला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणाचा पाणीसाठा 43.28 टक्क्यांवर आला आहे.

शहरवासीयांना पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. महापालिका दिवसाला पवनातून 510, चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रातून 70 आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) 15 असे 595 दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उचलते..

# शरद पवार यांना मोठा धक्का

## कट्टर समर्थक प्रवीण माने आणि माने कुटुंबियांचा अजित पवारांना पाठिंबा

**पुणे | प्रतिनिधी**

शरद पवारांना मोठा धक्का बसला आहे. सोनाईचे कट्टर समर्थक प्रवीण माने आणि माने कुटुंबियांनी शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांना पाठिंबा दिला आहे. अजित पवार हे विकसासाठी भाजप बरोबर गेले आहेत.आम्ही बारामतीचा विकास व्हावा यासाठी अजित दादा यांच्या बरोबर जात आहे, असं माने कुटुंबियांनी म्हटलं आहे.

बारामती लोकसभा मतदार संघ निवडणूक सुरू आहे. माने कुटुंब पवार कुटुंब सोबत राहिला आहे.अजित पवार यांचे हात बळकट करण्यासाठी माने कुटुंब त्यांच्या बरोबर राहणार आहोत. अजित पवार हे विकासासाठी भाजप बरोबर गेले आहेत.आम्ही विकास व्हावा यासाठी अजित दादा यांच्या बरोबर जात आहे. अजित दादांनी काम केले आहेत. आम्ही ठाम पणे अजित पवार यांच्या बरोबर जाण्याचं निर्णय घेतला आहे.आज पासून प्रचार सुरू करत आहोत,असं प्रवीण माने म्हणाले आहेत.



### शरद पवारांना मोठा धक्का..

प्रवीण माने आणि माने कुटुंब हे शरद पवारांचे निकटवर्तीय मानले जातात. अजित पवारांनी राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर शरद पवार गटाचा पुढील विधानसभेचा चेहरा म्हणून प्रवीण माने यांच्याकडेदेखील पाहिले जायचं. त्यांनी सुप्रिया सुळेंच्या प्रचाराची आखणीदेखील केली आणि प्रचारासाठी मैदानात देखील उतरले होते. मात्र आता ते सुनेत्रा पवारांचा प्रचार करताना दिसणार आहे.

महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारात सक्रिय होवून नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हात बळकट करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघातील सगळ्यात महत्त्वाचा विधानसभा मतदारसंघ म्हणून इंदापूरमध्ये आमदार दत्तात्रय भरणे अजित पवारांच्या बाजूला गेल्यानंतर शरद पवारांच्या बाजूने कमी परंतु प्रवीण माने हे शरद पवारांच्या बाजूला असल्याने पुढील विधानसभेचा चेहरा म्हणून प्रवीण माने यांच्याकडेदेखील पाहिले जायचं परंतु उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत इंदापूरमध्ये भाजपचा मेळावा पार पडणार होता. ज्यावेळी देवेंद्र फडणवीस इंदापूरला आले. त्यावेळी स्वागताला प्रवीण माने त्यांना अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. अखेर आज त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. लोकांना राजकारणा पेक्षा विकासला महत्व द्यावं वाटतं, त्यामुळे प्रवीण माने आणि कुटुंबियांनी अजित दादा बरोबर येण्याचा निर्णय घेतला आहे, असं प्रदीप गारटकर म्हणाले.

राज्याच्या विकासासाठी अजित पवार हे भाजपसोबत गेले आहेत. आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहोत. आता प्रचार सुरू होणार आहे. आजपासून आम्ही प्रचार सुरू करणार आहोत. 8 दिवसांपूर्वी लोकसभा मतदारसंघात सुनेत्रा पवार यांची उमेदवारी जाहीर झाली. सुनेत्रा वहिनीचं मोठं सामाजिक काम राहिलेलं आहे. पण वहिनी कधी प्रकाशझोतात आलेल्या नाहीत. आता मात्र त्या राजकारणत आलेल्या आहेत. त्यांना निवडून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करू, असेही प्रविण माने यांनी सांगितले. बारामतीनंतर इंदापूर तालुक्यात कामं सुरू आहेत. दादा इंदापुरात आले होते. काही व्यापाऱ्यांनी निवेदन दिलं होतं. विकास कामे अजित दादाच करू शकतात. म्हणून आम्ही निर्णय घेतला आहे असे प्रविण माने यांनी सांगितले.

# जागा वाटपाचा तिढा लवकरच सुटेल : अजित पवार

## घड्याळ,धनुष्यबाण,कमळ चिन्हावरील उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्न

**पुणे | प्रतिनिधी**

काही जागा ठरवण्याबाबत विलंब लागतो. आघाडी असो किंवा महायुती, काही जागा निश्चित करण्यामध्ये उशीर लागत असतो. पण, लवकरच याबाबत निर्णय होईल, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. पिंपरी- चिंचवडमध्ये थेरगाव येथे खासगी रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी आले असता ते पत्रकारांशी बोलत होते.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत जागा वाटपाचा तिढा सुटेल, अशी मिश्किल टिप्पणीही अजित पवार यांनी केली. प्रवीण माने हा मूळचा माझाच कार्यकर्ता असल्याचं सांगत माने यांच्या अजित पवार गटातील प्रवेशाला अजित पवार यांनी एक प्रकारे दुजोराच दिला.



### एकनाथ खडसेंच्या भाजप प्रवेशाला दुजोरा

**» एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या वृत्ताला उपमुख्यमंत्री अजित पवारांनी अप्रत्यक्षपणे दुजोरा दिलाय. बरेच दिवस त्यांची घालमेल सुरू होती, आता त्यांना निर्णय घ्यावसं वाटलं असं अजित पवार म्हणालेत. काही जागा ठरवण्याबाबत विलंब लागतो, आघाडी असेल किंवा महायुती असेल तर काही जागा निश्चित करण्यामध्ये विलंब लागत असतोचं पण लवकरच याबाबत निर्णय होईल असं अजित पवार यांनी स्पष्ट केले. पिंपरी चिंचवड मध्ये थेरगाव इथ रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असेल तोपर्यंत जागा वाटपाचा तिढा सुटेल अशी मिश्किल टिप्पणी ही अजित पवार यांनी केली. प्रवीण माने हा मूळचा माझाच कार्यकर्ता असल्याचं सांगत माने यांच्या अजित पवार गटातील प्रवेशाला अजित पवार यांनी एक प्रकारे दुजोराच दिला. मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीतील सर्वजण घड्याळ धनुष्यबाण आणि कमळ या चिन्हावरील उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्न करतील असंही ते म्हणाले.**

मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीतील सर्वजण घड्याळ धनुष्यबाण आणि कमळ या चिन्हावरील उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्न करतील, असंही ते म्हणाले. एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या वृत्तावर बोलताना त्यांचे बरेच दिवस घालमेल सुरू होती, आता त्यांना निर्णय घ्यावेसे वाटले असेल, असेही ते म्हणाले.

अजित पवार म्हणाले, 140 कोटी जनतेचा कारभार पाच वर्षाच्या अशा प्रकारचा महत्त्वाचा निर्णय आपल्या देशा मतदारांना घ्यायचा आहे. जनता अतिशय सुज्ञ विचारपूर्वक आहे. मला आता खात्री आहे. या देशाचा कारभार नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली तिला पुढे जाऊ शकतो दुसरा कुठलाही पर्याय विरोधी पक्षांमध्ये आपल्याला पाहायला मिळत नाहीये. त्यांना विरोध करण्याकरता त्यांनी आघाडी करण्याचा प्रयत्न केलेला आहे, असंही ते म्हणाले.

# विमानतळाला दि.बा.पाटील नावास आग्रही

## दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत केंद्र शासनाशी पत्र व्यवहार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पनवेल येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून आपण आधीही आग्रही होतो, आजही आग्रही आहे आणि नामकरण होईपर्यंत आग्रही राहीन, अशी भूमिका मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी स्पष्ट केली.

बारणे म्हणाले की, नवी मुंबई-पनवेल येथे होत असलेल्या नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिवंगत ज्येष्ठ नेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत आपण केंद्र शासनाची वेळोवेळी पत्र व्यवहार देखील केलेला आहे. पनवेल-उरण भागातील शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी आंदोलन करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाला भाग पाडले. एक कृतिशील नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. शेतकरी व भूमिपुत्रांसाठी रस्त्यावर उतरून त्यांनी सातत्याने लढा दिला.

अशा या दिवंगत दिग्गज नेत्याच्या सन्मानार्थ शासनाकडून विमानतळाला त्यांचे नाव दिले जात नाही, तोपर्यंत आपण सातत्याने त्याचा पाठपुरावा करू, या भूमिकेचा बारणे यांनी पुनरुच्चार केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकारणाबाबत विरोधकांकडून खोटी माहिती पसरविण्यात येत आहे. त्याबाबत खासदार बारणे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

### कोण होते दि. बा. पाटील

दि. बा. पाटील यांचे पूर्ण नाव दिनकर बाळू पाटील. त्यांचा जन्म उरण तालुक्यातील जासई इथं झाला. ते व्यवसायानं वकील होते. पनवेलचे नगराध्यक्ष, चार वेळा आमदार, विधानसभेचे विरोधी पक्षनेते आणि खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास. शेतकरी कामगार पक्षातून त्यांनी राजकारणाला सुरुवात केली. नवी मुंबईतील अनेक विकासकामांत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता.





### या नावांची होती चर्चा...

दि. बा. पाटील यांच्या व्यतिरिक्त राज्य सरकारनं बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता. बंजारा समाजानं या विमानतळाला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचं नाव द्यावं, अशी मागणी केली होती. सिडकोची संकल्पना ही माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची होती. त्यामुळं त्यांचं नाव विमानतळाला द्यावं, अशी मागणी पोहरादेवची मनंत सुनील महाराज यांनी केली होती. तर मनसे अध्यक्ष राज ठाकरे नवी मुंबईचं विमानतळ स्वतंत्र नाही. त्यामुळं जे नाव मुंबई विमानतळाला तेच नाव नवी मुंबई विमानतळाला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ असं देण्यात यावं, असं म्हटलं होतं. नाव कोणतं द्यायचं यावरून वरीच चर्चा सुरु होती. प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी दि. बा. पाटील यांचं नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यात यावं, यासाठी आंदोलनं केली होती. शेवटी प्रकल्पग्रस्तांची मागणी मान्य करण्यात आली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव मिळावे यासाठी मागील दोन वर्षांपासून आंदोलन आणि पाठपुरावा सुरू आहे. सोमवारी पनवेलमधील आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात झालेल्या बैठकीमध्ये दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीच्या अनेक सदस्यांनी केंद्रात व राज्य सरकारकडे अजून पाठपुरावा करणे आवश्यक असताना आंदोलनाची भूमिका घेणे आतेताईपणाचे ठरेल असे मत आल्याने तुर्तास कोकण भवन येथे केले जाणारे धरणे आंदोलनाची भूमिका कृती समितीने स्थगीत केल्याची माहिती या कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली.

# दिडशे भंगार गोडाऊन जळून खाक

## भंगार गोडाऊन भीषण आग : आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली परिसरात भंगार गोडाऊन भीषण आग लागल्याने दीडशे गोडाऊन जळून खाक झाले आहेत. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज अग्निशमन विभागाने वर्तवला आहे.

पिंपरी- चिंचवडमध्ये चिखली परिसरात भंगार गोडाऊनला भीषण आग लागल्याने दीडशे गोडाऊन जळून खाक झाले आहेत. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचा अंदाज अग्निशमन विभागाने वर्तवला आहे. चिखली परिसरात हजारो भंगार गोडाऊन आहेत. तिथे दरवर्षी आगीच्या घटना घडतात. आश्चर्यकारक बाबा म्हणजे आगीमध्ये जळून खाक झालेली दीडशे गोडाऊन हे अनधिकृत आहेत. अशी कबुली स्वतः महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. महानगरपालिकेचे अधिकारी मनोज लोणकर यांनी याबाबत माहिती दिली आहे. अठरा तास उलटून ही आग धुमसत असून कुलिंग चे काम सुरू आहे.

शनिवारी मध्यरात्री एकच्या सुमारास चिखलीतील गोडाऊनला भीषण आग लागली. आगीने रौद्ररूप धारण करत शेजारीच असलेल्या इतर गोडाऊनला देखील आग लागल्याने तब्बल दीडशेपेक्षा अधिक गोडाऊनला आग लागल्याची घटना घडली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, पीएमआरडीए त्याचबरोबर खासगी कंपन्यांकडून आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी १८ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर ही आग आटोक्यात आणली आहे. सध्या त्या ठिकाणी कुलिंगचं काम सुरू असून आग धुमसत असल्याने आणखी काही तास लागल्याची



शक्यता आहे. चिखलीत अगदी छोट्या गल्ल्यांमधून या दुकानांकडे जावं लागतं. त्यामुळे अग्निशमन वाहनांना त्या ठिकाणी जाण्यासाठी कसरत करावी लागली.

चिखली परिसरात बहुतांश भंगार गोडाऊनची संख्या ही हजारोंच्या घरात आहे. मात्र, यावर पिंपरी- चिंचवड महानगरपालिका कारवाई करताना दिसत नाही. आज घडलेल्या घटनेमध्ये अद्याप किती नुकसान झालं याबाबत माहिती समोर येऊ शकली नाही. अशी माहिती महानगरपालिकेचे अधिकारी मनोज लोणकर यांनी दिली आहे.

### तातडीने फायर ऑडिट करण्याची मागणी...

**» पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील व्यवसायाच्या ठिकाणीच राहणाऱ्या मिळकतींचे तातडीने फायर ऑडिट करण्याची आग्रही मागणी स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सिमाताई सावळे यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे आयुक्तांना दिलेल्या निवेदनात सिमाताई सावळे म्हणतात,छत्रपती संभाजीनगरमध्ये एक भयानक घटना घडली आहे. कापड दुकानाला लागलेल्या आगीत एकाच परिवारातील दोन जणांचा होरपळून व पाच जणांचा गुदमरून मृत्यू झालाय. पिंपरी चिंचवड शहरात मागील काही महिन्यात तळवडे, शाहूनगर, चिखली आदी ठिकाणी भीषण आगीच्या घटना घडल्याची नोंद आहे. धक्कादायक म्हणजे त्यात मोठ्याप्रमाणात जीवित व वित्त हानी झाली आहे. शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात मार्च महिन्यापासूनच उन्हाचा तडाखा वाढला आहे. अशा स्थितीत आगीच्या घटनांचे प्रमाण अधिक वाढते. मागील काही वर्षात आगीच्या अनेक गंभीर घटना घडल्या आहेत. या आगीच्या घटनांमध्ये जीवित व वित्त हानी झाली आहे, असे सिमाताईंनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.**

अनधिकृत भंगार गोडाऊनवर कारवाई करताना उदासीनता का दिसते? असा प्रश्न निर्माण होतो आहे. नशीब बलवत्तर असल्याने दुर्घटनेत कोणीही जखमी किंवा जीवितहानी झालेली नाही.

# तीन दिवस अवजड वाहनांना वाहतुकीस बंदी

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सकाळी सहा ते दुपारी बारा वाहतुकीस बंदी

**पुणे | प्रतिनिधी**

तीन दिवस अवजड वाहनांना मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सकाळी सहा ते दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान वाहतुकीस बंदी घालण्यात येणार असून ही वाहने कडेला थांबवण्यात येणार आहे.

सलग सुट्ट्यांमुळे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवासी वाहनांना रस्ता उपलब्ध व्हावा याकरिता सात एप्रिल ते नऊ एप्रिल असे तीन दिवस अवजड वाहनांना मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सकाळी सहा ते दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान वाहतुकीस बंदी घालण्यात येणार असून ही वाहने कडेला थांबवण्यात येणार आहे. तसेच गैरसोय टाळण्यासाठी अवजड वाहन चालक, मालकानी नमूद वेळेमध्ये वाहने आणू नयेत असे देखील आवाहन बोरघाट महामार्ग पोलिसांनी केले आहे.



शाळा आणि महाविद्यालय यांना उन्हयाळ्याची सुटी लागल्यामुळे वाहनांच्या संख्येत प्रचंड प्रमाण वाढ होत असते. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर महामार्ग पोलीस केंद्र बोरघाट हद्दीत घाट सेक्शन व मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग व एन. एच ४८ असा संयुक्तिक महामार्ग एकत्र येत असल्याने वाहनांचे प्रमाण अधिक होऊन वाहतूक संथ गतीने चालू असते. वाहतूक नियमन करण्यासाठी खालील प्रमाणे प्रयत्न करण्यात येणार आहेत. वाहतुकीचे नियमन करण्यासाठी दिवसा अवजड वाहने घाट सुरू होण्यापूर्वी शोल्डर लेनवर तसेच पार्किंगच्या ठिकाणी थांबवून हलक्या वाहनांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

मोटरीव्यासंख्येत वाढ झाल्यानंतर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुणे मर्गिकवेरील ताण कमी करण्यासाठी दहा ते पंधरा मिनिटे वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. मुंबई वाहिनीवरील वाहतूक खंडाळा बोगदा या ठिकाणी थांबवून पुणे वाहिनीवरील वाहतूक विरूध्द दिशेने वळविण्यात येणार आणि वाहतूक सुरळीत करण्यात येणार आहे. तापमान वाढीमुळे जड अवजड वाहने बंद पडत आहेत. त्यांना क्रेन, पुलर, पोलीस क्रेनच्या सहाय्याने लवकरात लवकर काढून वाहतुकीसाठी मार्गिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

पहिल्या मार्गिकेवर चालणाऱ्या जड अवजड वाहन चालकांवर खटला भरून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. बोरघाट पोलिसांनी जड अवजड वाहन मालक आणि चालक संघटना यांना आवाह न केले आहे की, त्यांनी सहा एप्रिल ते नऊ एप्रिल दरम्यान मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे मर्गिकेवर सकाळी सहा ते दुपारी बारा यावेळेत प्रवास टाळावा.

अतिरिक्त पोलीस महसंचालक सुखविंदर सिंह, रायगड परीक्षेत्राचे पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, पोलीस उपअधीक्षक घनःश्याम पलंगे, पनवेल विभागाच्या पोलीस निरीक्षक गौरी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बोरघाट महामार्गचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी दिली.

अवजड वाहन चालक, मालकांनी नमूद वेळेत वाहने महामार्गावर आणू नयेत असे आवाहन बोरघाट महामार्ग पोलिसांनी केले आहे. सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाहतुक खुपच वाढली आहे. महामार्ग पोलीस केंद्र बोरघाट हद्दीत घाट सेक्शन व मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग व एन. एच ४८ असा संयुक्तिक महामार्ग एकत्र येत असल्याने वाहनांचे प्रमाण अधिक होऊन वाहतूक संथ गतीने चालू असते.

### वाहतुकीत मोठे बदल...

» उन्हाळी सुट्टीमुळे अनेकजण सहकुटुंब पर्यटनासाठी बाहेर पडतात. लोणावळा, खंडाळा परिसरात मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होतात. त्यामुळे द्रुतगती मार्गावर वाहतुकीचा ताण वाढतो. मोठ्या संख्येने वाहने द्रुतगती मार्गावर आल्याने वाहतुकीचा वेग कमी होतो. त्यामुळे घाट क्षेत्रात वाहतूक कोंडी होते. घाटात वाहने बंद पडल्याने वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सोसावा लागतो. त्यामुळे वाहतूक नियमन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. वाहतुकीचे नियमन करण्यासाठी दिवसा अवजड वाहने घाट सुरू होण्यापूर्वी रस्त्याच्या कडेला थांबविण्यात येणार आहेत. मोटारीसह हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार आहे. मोटारींच्या संख्येत वाढ झाल्यानंतर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुणे मार्गिकेवरील ताण कमी करण्यासाठी दहा ते पंधरा मिनिटे वाहतूक बंद (ब्लॉक) ठेवण्यात येणार आहे. मुंबई मार्गिकेवरील वाहतूक खंडाळा बोगदा परिसरात थांबवून पुणे मार्गिकेवरील वाहतूक विरुद्ध दिशेने वळविण्यात येणार असून, वाहतूक सुरळित करण्यात येणार आहे. तापमान वाढीमुळे जड-अवजड वाहने बंद पडत आहेत. त्यांना क्रेन, पुलर, पोलिस क्रेनच्या मदतीने वाहने लवकरात लवकर काढून वाहतुकीसाठी मार्गिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती महामार्ग पोलिसांनी दिली.

# सुनेत्रा पवार अन् धंगेकरांची तळजाई टेकडीवर भेट

## सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार बारामती मतदारसंघात पुण्यालगतच्या परिसरांमध्ये प्रचार

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरती बारामती आणि पुणे लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रचाराला वेग आलेला आहे. उमेदवारांकडून वैयक्तिक गाठीभेटी आणि मेळाव्यांचा धडाका लावण्यात आलेला आहे. याच प्रचाराच्या धामधुमीत बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि पुणे लोकसभेचे उमेदवार रवींद्र धंगेकर हे रविवारी ( 7 एप्रिल ) सकाळी तळजाई टेकडी येथे समोरासमोर आले. यावेळी दोन्ही उमेदवारांनी एकमेकांना शुभेच्छा देत गप्पागोष्टी केल्या. सध्या राज्यात सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर, असे सुसंस्कृत राजकारणाचे चित्र देखील पाहायला मिळालं.

सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार या दोन्ही उमेदवार सध्या सातत्याने बारामती लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या पुण्यालगतच्या परिसरांमध्ये प्रचार करताना दिसत आहेत. गेल्या तीन दिवसांपासून महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यादेखील पुणे शहरालगतच्या भागांमध्ये प्रचार करताना दिसत आहेत. यादरम्यान त्या विविध सोसायटीमध्ये नागरिकांसोबत संवाद साधत आहेत.



रविवारी सुनेत्रा पवार खडकवासला मतदारसंघात येणाऱ्या तळजाई टेकडी या परिसरामध्ये प्रचारासाठी पोचल्या होत्या. याचदरम्यान महाविकास आघाडीचे पुणे लोकसभेचे उमेदवार रवींद्र धंगेकर हे देखील याच परिसरात प्रचारासाठी आले असता दोन्ही उमेदवारांची यावेळी भेट झाली. यावेळी दोन्ही उमेदवारांनी चर्चा करत एकमेकांना निवडणुकीसाठी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांनी एकामेकांशी संवाद साधला. दोन्ही नेत्यांसोबत अनेकांनी तळजाई टेकडीवर फोटो काढले.

यावेळी आमदार भीमराव तापकीर, उल्हास पवार, दत्ता धनकवडे, आप्पा रेणुसे, सुभाष जगताप, अशोक हरणावळ यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.